# सेतू अभ्यास २०२३ : मराठी – इयत्ता सातवी : उत्तर चाचणी

**इयत्ता : सातवी** **एकूण गुण : ३०**

**विद्यार्थ्याचे नाव :** ........................................................................... **हजेरी क्र. :** ...................

**शाळेचे नाव :** ........................................................................................ **दिनांक :** ......................

**प्र. १) खाली दिलेला उतारा वाच व त्यावर आधारित प्रश्नांची उत्तरे लिही. (06.01.09)** **(५ गुण)**

ज्येष्ठ महिना सुरू झाला, की पावसाचे वेध लागतात. सोसाट्याचा वारा आणि पहिल्या पावसाच्या सरींची वार्ता पसरवणारा मातीचा सुगंध हे अगदी प्रत्येक वर्षी येतच असतं. तरीही ते दरवेळी नवीन वाटतं. बालपणी बेफाम होऊन 'ये गं ये गं सरी, माझे मडके भरी'च्या तालावर पावसात चिंब चिंब भिजणं आणि त्याबद्दल आई-वडिलांकडून पोटभर मार खाणं. आजी-आजोबांकडून कागदी होड्या करायला शिकून त्या पावसाच्या पाण्यात सोडण्यासाठी पुन्हा पावसाची आतुरतेने वाट पाहणं. अशा कितीतरी आठवणी घेऊन दरवर्षी पाऊस येत असतो; पण मोठं झाल्यावर इंद्रधनुष्यात उमलणाऱ्या रंगांचे अर्थ उमगू लागतात. बरसण्याचा अर्थ कळू लागतो आणि हुरहूर, तळमळ अशा शब्दांचा थेट प्रत्यय येऊ लागतो. पावसाच्या आगमनाने गतकाळातले "ते क्षण" पुन्हा जिवंत होतात. डोळ्यांसमोर येऊ लागतात आणि कधी कधी पापण्यांमधून अलगदपणे वाहूनही जातात. मग डोळ्यांतला कोणता आणि बाहेरचा कोणता तेच कळत नाही. असं बरंच काही अनुभवायचं असेल तर वरंधा घाट गाठलाच पाहिजे.

अ) पाऊस आला की तू काय करशील?

.........................................................................................................

ब) खाली दिलेली कवितेची ओळ पूर्ण कर.

ये गं ये गं सरी, माझे मडके भरी

.................................. मडके गेले वाहून

क) खालील शब्दसमूहाचा वापर करून वाक्य तयार करा.

आतुरतेने वाट पाहणे.

.........................................................................................................

ड) तुला कोणता ऋतू आवडतो, का ते लिही.

.........................................................................................................

इ) पावसाळा या ऋतूमध्ये घ्यावयाची काळजी याबाबत एक सूचना तयार कर.

.................................................................................................

**प्र. २) खाली दिलेल्या सूचनेनुसार बदल करून लिही. (06.01.28)** **(५ गुण)**

१) मला रंगपेटी आणायची आहे. (अधोरेखित सर्वनामाचा प्रकार लिहा.)

.................................................................................................

२) 'कोणी' हे सर्वनाम वापरून वाक्य तयार करा व लिही.

.................................................................................................

३) खालील धातूपासून बनणाऱ्या चार धातूसाधितांचे लेखन कर.

.................................................................................................

४) खालील ओळीतील विशेषण ओळखून लिही.

धरतीवर सोनेरी किरणे पसरली होती.

.................................................................................................

५) योग्य पर्याय निवड व वाक्य पूर्ण कर.

सुजयने चित्र ..........................  . (काढणार, काढले, काढतो)

**प्र. ३) खालील कविता वाच व त्यावर आधारित प्रश्नांची उत्तरे लिही. (06.01.08)** **(५ गुण)**

*अरे खोप्यामधी खोपा*
*सुगरणीचा चांगला*
*देखा पिलासाठी तिनं*
*झोका झाडाले टांगला ।*
*पिलं निजले खोप्यात*
*जसा झुलता बंगला*
*तिचा पिलामधी जीव*
*जीव झाडाले टांगला ।*

*खोपा इनला इनला*
*जसा गिलक्याचा कोसा*
*पाखराची कारागिरी*
*जरा देख रे मानसा ।*
*तिची उलूशीच चोच*
*तेच दात, तेच ओठ*
*तुले देले रे देवानं*
*दोन हात दहा बोटं ।*

१) कवितेतील यमक जुळणाऱ्या शब्दांची एक जोडी लिही.

.......................................................................................................

२) कवितेला शीर्षक दे.

.......................................................................................................

३) 'पाखरू' या शब्दाला पर्यायी मराठी शब्द लिही.

.......................................................................................................

४) तिची उलूशीच चोच, तेच दात तेच ओठ
तुला दिले रे देवानं, दोन हात दहा बोटं
या ओळींचा तुम्हाला समजलेला अर्थ लिहा.

.......................................................................................................

.......................................................................................................

.......................................................................................................

.......................................................................................................

**प्र. ४) तुमच्या शाळेतील शिपाई काकांची किंवा पोषण आहार तयार करणाऱ्या व्यक्तीची माहिती लिही. (06.01.25) (५ गुण)**

.......................................................................................................

.......................................................................................................

.......................................................................................................

.......................................................................................................

.......................................................................................................

.......................................................................................................

**प्र. ५) रेल्वे स्थानकावरील पोलीस काका व तुमच्यात झालेला संवाद कल्पनेने लिही. (06.01.14) (५ गुण)**

.......................................................................................................

.......................................................................................................

........................................................................................................

........................................................................................................

........................................................................................................

........................................................................................................

........................................................................................................

........................................................................................................

**प्र. ६) खालील परिच्छेद आरोह–अवरोहांसह वाच. (06.01.11)** **(५ गुण)**

**आपली सुरक्षा आपले उपाय**

दीपा घाबरीघुबरी होऊन धावतपळतच घरात शिरली. तिने आईला घट्ट मिठी मारली अन् म्हणाली, ''आई शेजारच्या गल्लीतल्या एका काकूंच्या घरात गॅसच्या टाकीचा स्फोट झाला. सगळे लोक त्या घराच्या दिशेने धावत होते. घरात नुसता जाळ दिसत होता. लोक पाण्याच्या बादल्या, मातीची घमेली नेत होते. एका काकांनी गाडी काढली अन् काकूंना दवाखान्यात नेले. आई, त्या काकू बऱ्या होतील ना गं?'' एका दमात दीपाने पाहिलेले दृश्य आईला सांगितले. हे सगळे पाहून ती खूप घाबरली होती.

आई तिला म्हणाली, ''बाळ, त्या काकू नक्कीच बऱ्या होतील. त्यांना नेलंय ना दवाखान्यात. अगं, आता वैद्यकीय क्षेत्रात खूप प्रगती झाली आहे. नवनवीन औषधं, नवनव्या तंत्रज्ञानांचा वापर सुरू झाला आहे. तू घाबरून जाऊ नकोस.'' तरीही दीपाच्या मनात अनेक प्रश्न होते.